**पुणे महानगरपालिकेच्या कामा करिता** नगरसचिव कार्यालय,

पुणे महानगरपालिका

✷ सूचना ✷

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील

नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ४**

**(खास सभा)**

**मा.दिपक उर्फ बाळासाहेब बोडके, अध्यक्ष, स्थायी समिती ,मा.फारूक इनामदार, मा.सुनिल गोगले, मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे , मा.अविनाश बागवे, मा. राजेंद्र शिळीमकर या स्थायी समितीच्या ६ ( सहा ) मा. सभासदांकडून दिनांक ३/६/२०१६ रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास ) सभा गुरूवार, दिनांक ९/६/२०१६ रोजी सकाळी ११.०० (अकरा ) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात )भरेल.**

**सदर सभेत मा.मुख्य सभेने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार म.न.पा.प्रशासनाकडून खालीलप्रमाणे आलेली माहिती/अहवाल/खुलासा यावर विचार होईल.**

विषय क्रं.२१८

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील मुख्य लेखा परिक्षक कार्यालयाकडून बांधकाम विषयक नोंदविण्यात आलेल्या आक्षेपांची नगर अभियंता व अति.नगर अभियंता ( बांधकाम विकास ) कार्यालयाकडून केलेल्या पूर्ततेच्या अहवालाबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र.अतिमआ(वि)/गोप/१९,दि.२१/६/२०१४ ने पाठविलेला अहवाल.

विषय क्रं.२१९

मागील ३ वर्षामध्ये पुणे महानगरपालिकेने किती व कोण–कोणत्या कन्सलटंटची नेमणूक केली आहे?कन्सलटंटने ३ वर्षात कोणकोणती कामे केली व त्यांना किती रकमा अदा केल्या आहेत. याबाबत मा.अति.नगर अभियंता ( पथ ) यांनी जा.क्र.पथ १७७२, दि.७/७/२०१४ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२२०

जेएनएनयुआरएम अंतर्गत नव्याने उभारण्यात येणारे पर्वती जलशुध्दीकरण प्रकल्प ( ५००एमएलडी) व अन्य प्रकल्पांबाबत,पुणे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन या प्रकल्पाची आवश्यकता पाहता केंद्र शासनास आवश्यक तो पत्रव्यवहार करावा. याबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र.पापु २१६,दि.२८/७/२०१४ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२२१

ठेकेदार नितीन वरघडे यांनी केलेल्या विकास कामाबाबत मा.अति.महा.आयुक्त ( वि) यांनी जा.क्र. अतिमआ(वि)/६८२, दि.१६.१०.२०१४ ने पाठविलेला चौकशी अहवाल.

विषय क्रं.२२२

विधी खात्याचा अहवाल द्यावा.सन २०१२–२०१३ पासून सर्व न्यायालयातून ( जिल्हा न्यायालय, मे.हायकोर्ट, मे.सुप्रिम कोर्ट) किती केसेस निकाली निघाल्या. यामध्ये किती केसेसचा निकाल महानगरपालिकेच्या बाजूने लागला व किती केसेसचा निकाल महापालिकेच्या विरोधात गेला. मनपा ज्या केसेस हारली त्याची कारणे नमूद करावीत. याबाबत मा.म्युनिसिपल प्रॉसिक्युटर यांनी जा.क्र.एमपीओ/१९३८, दि.१/१२/२०१४ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२२३**

कोर्ट केसेस बाबत म्युनिसिपल प्रॉसिक्युटर यांनी जा.क्र.एमपीओ/१९३९, दि.२/१२/२०१४ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२२४**

मोबाईल टॉवर बांधकाम परवानाबाबतची मा.नगरअभियंता यांनी जा.क्र.नअ/जा/ज/९१४, दि.२२/१२/२०१४ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२२५**

वृक्ष प्राधिकरण समितीने वृक्ष तोडीची दिलेल्या परवानगीबाबतचा अहवाल सादर करावा. यामध्ये झाडांचे पुनर्वसन झाले आहे का?२१०० झाडे कोणत्या ठिकाणी लावणार इ.बाबत. तसेच संबंधीतांना दिलेल्या बांधकाम परवानगी स्थगित ठेवावी.याबाबत मा.वृक्ष अधिकारी यांनी जा.क्र.७८५७, दि.१९/१/२०१५ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२२६**

ई–गर्व्ह.संदर्भातील प्रोबेटी कंपनीबाबतचा आढावा मुख्यसभेला सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.६८१, दि.२७/१/२०१५ चे पत्र.

**विषय क्रं.२२७**

पुणे शहरातील सर्व अनधिकृत जाहिरात बोर्डबाबत मा.उपआयुक्त (तां) यांनी जा.क्र.एल/२१९६,दि. २४/३/२०१५ ने पाठविलेला अहवाल.

**विषय क्रं.२२८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाकडील जाहिरात फलकाचे दि.१/४/२०१५ ते ३०/९/२०१५ या कालावधीचे नूतनीकरणाबाबत मा.उपआयुक्त (तां) परवाना व आकाशचिन्ह विभाग यांनी जा.क्र.एल/७४, दि.१३/४/२०१५ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२२९**

पुणे शहरातील हॉस्पीटल मधील अनाधिकृत बांधकामाबाबत मा.शहर अभियंता यांनी जा.क्र.श.अ/जा/ज/४६, दि.१६/४/२०१५ ने पाठविलेला अहवाल.

**विषय क्रं.२३०**

आरोग्यखाते, शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेच्या सद्यस्थितीबाबत मा.आरोग्य अधिकारी यांनी जा.क्र.एच/ओ/१४९, दि.१६/४/२०१५ ने पाठविलेला अहवाल.

**विषय क्रं.२३१**

पुणे शहरात महानगरपालिकेमार्फत चालू/प्रस्तावित असलेल्या उड्डाणपूल, नदीवरील पूल, कॅनॉलवरील पूल इत्यादी कामांच्या माहितीबाबत मा.मुख्य अभियंता(प्रकल्प) यांनी जा.क्र.५९९, दि.१६/५/२०१५ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२३२**

पुणे महानगरपालिकेच्या मिळकती ५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी दिलेल्या संस्था/व्यक्ती यांची यादी तसेच थकीत रकमेचा तपशिल द्यावा याबाबत मा.उपआयुक्त मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी जा.क्र.मा.व्य./२५९०, दि.१७/७/२०१५ ने पाठविलेली माहिती.

**विषय क्रं.२३३**

पीएमपीएमएलबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचा दि. ५/८/२०१५ चा अहवाल.

विषय क्रं.२३४

व्हेईकल डेपोकडे झालेल्या लिलावाबाबत मा.अधिक्षक अभियंता (यां.) मोटार वाहन विभाग यांनी जा.क्र.यांत्रिकी/मोवावि/१, दि.२८/९/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२३५

माहे मार्च २०१५ कार्यपत्रिका विषय क्र.७०२ मधील नाना पेठ एस.आर.ए.स्किमच्या टी.डी.आर.बाबतची माहिती सादर करणेबाबत मा.शहर अभियंता यांनी जा.क्र.श.अ./जा.ज./१०२१, दि.२९/९/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२३६

माहे नोव्हेंबर २०१५ कार्यपत्रिका विषय क्र.४८२ च्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी दिल्यास–महानगरपालिकेचे किती आर्थिक नुकसान होणार आहे? या मंजूरीमुळे किती प्रकल्पांना फायदा होणार आहे ? त्या प्रकल्पांची नावे व आर्थिक फायद्याची रक्कम याबाबत मा.शहर अभियंता यांनी जा.क्र.डी.पी.सेल/४१६, दि.२९/९/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२३७

पुणे मनपाच्या भाजी मंडई गाळ्यांचा इतर व्यापारी कारणासाठी वापर होत आहे का याबाबत मा.सह.आयुक्त परिमंडळ विभाग क्र.२ यांनी जा.क्र.सह–२/७५४, दि.२९/९/२०१५ ने पाठविलेला अहवाल.

विषय क्रं.२३८

काही दुकानांमध्ये प्राणी–पक्षी कत्तल करण्याची परवानगी दिली आहे का? पुणे मनपाने कोंढवा येथे कत्तलखाना सुरू केल्यापासून प्रशासनाने तेथे किती कर्मचारी उपलब्ध करून दिले आहेत आणि त्याकरिता किती तरतुद केली होती.याबाबत मा.आरोग्यप्रमुख यांनी जा.क्र.एच.ओ./३२७१,दि.३०/९/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२३९

डिफर्ड पेमेंटचे टेंडर प्रक्रियेबाबत प्र.मुख्य अभियंता (पथ) यांनी जा.क्र.४२६४, दि.१/१०/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२४०

पुणे शहरांत एम.एस.ई.डी.सी.एल.विभागामार्फत खोदाई करून टाकलेल्या केबलबाबत मा.कार्यकारी अभियंता(पथ) यांनी जा.क्र.पथ/४२७६, दि.३/१०/२०१५ ने पाठविलेला अहवाल.

विषय क्रं.२४१

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून पुणे मनपा पाणी पुरवठा विभागासाठी किती अधिकाऱ्यांना नेमण्यात आले होते? ते संबंधीत अधिकारी कोणकोणत्या विभागामध्ये काम करीत आहेत याबाबत मा.मुख्य अभियंता,पाणीपुरवठा व मलनि:नसारण प्रकल्प यांनी जा.क्र.१०२५, दि.५/१०/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२४२

कंत्राटी सेवकांसाठी ठेकेदारांनी कार्ड सिस्टीम करावी व या सेवकांचे खात्यावर महानगरपालिकेने पैसे जमा करावेत याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.अति.म.आ.(ज)/एल.ओ./७३४,दिनांक १७/११/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२४३

पुणे शहरामध्ये एस.आर.ऐ.योजनेतंर्गत जे प्रकल्प राबविण्यात आले, त्यामध्ये महानगरपालिकेला किती सदनिका प्राप्त झाल्या याबाबत मा.उपआयुक्त मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी जा.क्र.मा.व्य./४९४८, दि.२०/११/१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२४४

पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाबाबत मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/मेट्रोसेल/३१८३, दि.३०/११/२०१५ ने पाठविलेली माहिती.

विषय क्रं.२४५

१) मिळकतकर वसूली बॅन्डपथकाच्या बाबतीत धोरण तयार करून सुस्पष्टता आणावी, श्री.रविंद्र बराटे यांच्या थकीत

मिळकतकर आणि वसूली उपाययोजनाबाबतची माहिती द्यावी, मिळकत कर विभागाशी संबंधीत मा.सभासदांनी केलेल्या तक्रारीबाबत एकत्रित अहवाल द्यावा.

२) दुबार मिळकती तातडीने निर्लेखित करून या मिळकतींची माहिती द्यावी.

३) शहरातील निवासी मिळकतींचा अनधिकृतपणे व्यापारी वापर होत असून त्यांच्यावर व्यापारी दराने मिळकतकर आकारून त्याबाबतची माहिती सादर करावी.

४) धनकवडी के.के.मार्केट येथील व्यापारी संकुलातील एकूण गाळे आणि मिळकतकर आकारणी मधील तफावत व त्यांचेकडील थकबाकी वसूलीबाबतच्या उपाययोजनांची माहिती द्यावी.

५) मोबाईल टॉवर्स कंपन्यांकडील एकूण थकबाकी त्वरीत वसूल करून माहिती सादर करावी.

६) आय.टी.सेक्टर मधील सर्व आय.टी.मिळकतींचा मिळकतकर वसूल करून, त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

७) घोरपडी पेठ येथील निवासी मिळकतीबाबत मा.खातेप्रमुख यांचेसह चर्चा केल्यानुसार, संबंधीतांकडून मिळकतकर थकबाकी तातडीने भरून घेऊन माहिती सादर करणेबाबत मा.उपआयुक्त तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांनी जा.क्र.टी.जी.ओ/५१९२, दि.१५/१२/२०१५ ने पाठविलेली माहिती.

<u>विषय क्रं.२४६</u>

१) पुणे महानगरपालिकेच्यावतीने शहरातील कोणकोणत्या हॉस्पीटल्ससाठी जागा, टी.डी.आर.बांधकाम परवानगी इ.मध्ये सवलती देण्यात आल्या ?

२) शहरातील विविध हॉस्पीटलमध्ये महानगरपालिकेसाठी राखीव असलेल्या बेडस्‌बाबतची व हॉस्पीटलमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सोयी व मोफत सुविधांबाबतची माहिती पुस्तिका प्रकाशित करावी.

३) शहरातील कोणकोणत्या हॉस्पीटल्स सोबत महापालिकेने करारनामे केले आहेत व त्यानुसार नागरिकांना रूग्णोपचार सुविधा देण्यात येते अगर कसे ?

४) पुणे शहरातील कोणकोणत्या रूग्णालयांकडून मनपाच्या शहरी गरीब योजनेतंर्गत नागरिकांना रूग्णोपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली ?

५) जेनरिक मेडिसिनची ( कंट्रोल रेटची ) मेडिकल दुकाने लवकरात लवकर सुरू करण्यासाठी कार्यवाही करावी.

याबाबत मा.आरोग्य अधिकारी यांनी जा.क्र.एच.ओ./४५९२,दि.२२/१२/२०१५ ने पाठविलेली माहिती.

<u>विषय क्रं. २४७</u>

कोथरूड टी.डी.आर.घोटाळा प्रकरणी मा.उप आयुक्त (सा.प्र.)यांनी जा.क्र.उआ/सा.प्र./९७, दि.२५/४/२०१६ ने पाठविलेला खातेनिहाय चौकशी अहवाल.

<u>विषय क्रं. २४८</u>

कोथरूड टी.डी.आर.घोटाळा प्रकरणी पूर्वी किंवा त्यावेळी जो टी.डी.आर.पुणे शहरात देण्यात आला होता. सदरचा टी.डी.आर.कोठे कोठे लोड करण्यात आला आहे. याबाबत मा.शहर अभियंता यांनी जा.क्र.शअजा/ज/२६२, दि.११/५/२०१६ ने पाठविलेली माहिती.

<u>विषय क्रं. २४९</u>

बाह्यस्त्रोत/कंत्राटदारामार्फत नेमण्यात येणाऱ्या मनुष्यबळाबाबत धोरण ठरविणेकामी गठीत समितीच्या शिफारशीबाबत मा.उपआयुक्त (सा.प्र.) यांनी जा.क्र.उआ(साप्र)/२७८, दि.२/६/२०१६ ने पाठविलेला अहवाल.

<u>विषय क्रं. २५०</u>

आर –७ बाबत मा.शहर अभियंता यांनी जा.क्र.शअजा/ज/४८१, दि.३/६/२०१६ ने पाठविलेली माहिती.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :– ३/६/२०१६

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील मनपा प्रशासनाकडून आलेली माहिती/अहवाल/खुलासा मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**